राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक - ९३/२०२६/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे

तक्रारदार	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलिय अधिकारी तथा
सचिन कापुरे	सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड, जि. पुणे.	पोलीस उपायुक्त , परिमंडळ -२ पिंपरी चिंचवड. जि. पुणे.

(आदेश दिनांक २८.०७.२०२६)

तक्रारदार यांचा कलम-१८ अंतर्गत तक्रार अर्ज दि. १२.०३.२०२६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाला आहे. तक्रारदार यांनी या तक्रार अर्जाद्वारे द्वितीय अपील क्र. ८८८७अ/२०२४/पुणे या प्रकरणी आयोगाचे आदेशाची अंमलबजावणी केली नाही अशी तक्रार केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे आणि त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणानी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

सदर तक्रार अर्जाशी संबंधित व्दितीय अपील क्र. ८८८७अ/२०२४/पुणे यामध्ये आयोगाने दिनांक २०.०२.२०२६ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला आहे. प्रस्तुत प्रकरणी उपलब्ध असलेल्या अभिलेखावरून असे दिसून येते की आयोगाने पारित केलेल्या आदेशानुसार सहा. पोलीस आयुक्त वाकड विभाग, पिंपरी चिंचवड, व पोलीस उपायुक्त परिमंडळ -२ पिंपरी चिंचवड. यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

सदर प्रकरणात जन माहीती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड, जि. पुणे. व पोलीस उपायुक्त, परिमंडळ -२ पिंपरी चिंचवड. यांना सूचित करण्यात येते की त्यांनी वर नमूद द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार सदरचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात कार्यवाही करावी व तसे तक्रारदार यांना कळवावे.

आदेश

वरील निर्देशासह तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे

तक्रार क्रमांक- ९३/२०२६/पुणे जावक.क्र - 3667 दिनांक- 418126